म.सं.कौ.हि.का.अर्ज २०/२०२४
ज्योती संबारे –वि.– गोपाल संबारे
निशाणी क्र.२५ खाली.

<u>अर्जदारातर्फे सा.क्र.१</u>
नावः ज्योती गोपाल संबारे
वयः ३० वर्ष, धंदा– घरकाम
रा. बेलाड, ता.मलकापुर, जि. बुलडाणा.
ह.मु.आकोट रोड, शेगांव, ता.शेगांव, जि.बुलढाणा

<u>पुढील सरतपास अर्जदारातर्फे श्रीमती कुमकुले वकील यांचे मार्फत.</u>

माझ्या प्रतिज्ञालेखातील मजकुर मला आता वाचुन दाखविला तो माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला असुन त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचा प्रतिज्ञालेख हा नि.क्र.२५ वर आहे.

मी अभिलेखावर लग्नाचा फोटो दाखल केला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येतो. मी अभिलेखावर माझे आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येतो. मी अभिलेखावर अर्जदार क्र.२ चे आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येतो. मी अभिलेखावर दिनांक ०२.०९.२०२० रोजीचे एनसी तसेच सुचनापत्र दिनांक १०.०७.२०२४ ची पडताळणी केल्याल्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यास **नि.क्र.३९ व ४०** देण्यात येतो. मी अभिलेखावर गैरअर्जदाराचे मौजे बेलाड येथील गट क्र.४१, ४२ व २४ च्या ७/१२ च्या प्रती दाखल केल्या आहे. त्यास **नि.क्र.४१, ४२, ४३** देण्यात येतो. मी अभिलेखावर गैरअर्जदाराविरुध्द दाखल चार्जशीटची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४४** देण्यात येतो. मी अभिलेखावर गैरअर्जदाराविरुध्द दाखल एफआयआरची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४५** देण्यात येतो.

**मध्यानांची वेळ झाली असल्याने साक्षीदाराचा उलटतपास तहकुब करण्यात आला.**

<u>साक्षीदाराचा उलटतपास गैरअर्जदाराचे वकील श्री.व्ही.जी.इंगळे यांचेमार्फत</u>

मी दहावी नापास आहे. माझे शिक्षण शेगांव येथील बुरुंगले महाविद्यालयात झाले. मी गैरअर्जदार क्र.१ सोबत नांदण्यास तयार आहे.
प्रश्न– तुम्ही तयार आहात तर राहण्यास जात का नाही
उत्तर– कारण गैरअर्जदाराकडुन मला त्रास आहे.

आम्ही घरात तीन भाऊ बहीणी आहोत. मला दोन भाऊ आहे मी एकटी बहीण आहे. हे म्हणने खरे आहे की त्यामुळे मी घरात सर्वांचे लाडाची आहे. हे म्हणने खरे आहे की लग्नापुर्वी मला माझ्या आईने लाडात वाढविले आहे. हे म्हणने खरे आहे की त्यामुळे माझी आई घरातील जास्त कामधंदा मला करु देत नव्हती. हे म्हणने खरे आहे की माझी माहेरची आर्थीक साधारण मध्यमवर्गीय आहे. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदाराची परीस्थीती गरीबीची आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगते की त्याची परीस्थीती आमचेपेक्षा चांगली आहे. हे म्हणने खरे आहे की हे माझे दुसरे लग्न आहे व त्यामुळे अत्यंत साध्या व आदर्श पध्दतीने आमचा विवाह झाला. हे म्हणने खरे नाही की लग्नात आम्ही खर्च केला नाही. माझे लग्न अरेंज मॅरेज आहे. हे म्हणने खरे आहे की माझ्या घरच्यांनी मुलगा पाहिला व मी त्याला होकार दिला. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ हे मला सुरवातीपासुन पसंत नव्हते. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ मला पसंत नसतांना केवळ घरच्यांची इच्छा म्हणुन मी त्यांचेसोबत लग्न केले. हे म्हणने खरे नाही की आमचे लग्न आदर्श पध्दतीने झाले असल्याने लग्नात कुठलेही आंदन देण्यात आले नाही. साक्षीदार स्वताहुन सांगते की, पहिल्या लग्नात जे आंदन आले होते ते सर्व गैरअर्जदाराकडे दिले आहे. माझ्या अर्जात मी नमुद केले आहे की माझ्या वडीलांनी मला सोन्याची पोथ, कानातले दिले होते परंतु त्याबाबतच्या पावत्या मी अभिलेखावर दाखल केल्या नाही. हे म्हणने खरे आहे की आंदणाबाबतच्या पावत्या अभिलेखावर मी दाखल केलेल्या नाही. हे म्हणने खरे नाही की अश्या कुठल्याही प्रकारचे आंदन व सोन्याचे दागीने दिले नसल्यामुळे त्याबाबतच्या पावत्या अभिलेखावर दाखल केलेल्या नाहीत. साक्षीदार स्वत:हुन सांगते की ब–याचे वर्षापुर्वीचे असल्यामुळे पावत्या हरवलेल्या आहेत. मला पावत्या कोणत्या वर्षाच्या आहेत हे आठवत नाही.

ज्ञानेश्वर गुलाबराव संबारे हे माझे जेठ आहे. हे म्हणने खरे आहे की त्यांचे लग्न माझ्या लग्नाचे पुर्वी झाले होते. हे म्हणने खरे नाही की ते त्यांचे पत्नीसोबत वेगळे राहत होते. हे म्हणने खरे आहे की लता माझी नणंद आहे व तिचे लग्न माझ्या लग्नापुर्वी गैरअर्जदार क्र.५ सोबत झाले होते. हे म्हणने खरे आहे की ते कु–हा काकोडा येथे राहतात. साक्षीदार स्वत:हुन सांगते की ते आठ पंधरा दिवसांनी सासरी येत जात होते. हे म्हणने खरे नाही की माझे जेठ त्यांचे पत्नीसह विभक्त राहत होते.

प्रश्न–तुमची नणंद व नंदोई हे विभक्त राहत होते.

उत्तर– त्यांचे जाणे येणे सुरु राहायचे.

म.सं.कौ.हि.का.अर्ज २०/२०२४
ज्योती संबारे –वि.– गोपाल संबारे
निशाणी क्र.२५ खाली.

**साक्षीदाराचा पुढील उलटतपास न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्विकृत

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 17:08:09 +0530

दि.११.०३.२०२६

(श्रीमती एम. के. गोटे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कोर्ट क्र.२ शेगांव.